डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त दिक्षाभूमी, चंद्रपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकाम व परिसराचे सुशोभिकरणास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०१६/ प्र.क्र.६११/ बांधकामे

मंत्रालय, विस्तार इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा :-</u>
१) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/ प्र.क्र.१६३/बांधकामे, दि.९/१०/२०१५
२) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/बांधकामे, दि.२४/३/२०१७
३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/मावक/दिक्षाभूमी, चंद्रपूर/ ऐति.स्थळ/प्र.क्र. /२०१७-१८/का.१२/१२९६, दि.०४/०९/२०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

चंद्रपूर येथे दि.१६ ऑक्टोबर, १९५६ ला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तीन लाखांपेक्षा जास्त लोकांना बौध्द धर्माची दीक्षा दिली. या दिवसाची साक्ष म्हणून प्रत्येक वर्षी दीक्षाभूमी, चंद्रपूर येथे १५ व १६ ऑक्टोबरला धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभ साजरा केला जातो. संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीच्या निकष व नियमावलीच्या आधारे तसेच मा.मंत्री (सा.न्या.व वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. १ ऑगस्ट,२०१६ रोजी झालेल्या बैठकीत एकूण २८ स्थळांची यादी अंतिम करण्यात आली आहे. सदर यादीमध्ये अ.क्र.९ येथे दीक्षाभूमी, चंद्रपूर या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकाम व परिसराचे सुशोभिकरणाच्या समावेश असून, सदर प्रस्तावास शासन निर्णय दि. २४/३/२०१७ अन्वये २ कोटीच्या मर्यादेत तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत दीक्षाभूमीच्या विकासासाठी अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटी, चंद्रपूर यांनी दीक्षाभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकाम व परिसर सुशोभिकरणाच्या सादर केलेल्या रुपये १,९८,१५,३००/- (रुपये एक कोटी अठ्याण्णव लाख पंधरा हजार तीनशे फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दि. ८ मार्च,२०१७ अन्वये लेखाशीर्ष ३६३६ अंतर्गत देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता अधिक्रमित करुन आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दि.०४ सप्टेंबर, २०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेबत आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त दिक्षाभूमी चंद्रपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधकाम व परिसराचे सुशोभिकरणाच्या एकूण रु. १,९८,१५,३००/-(रुपये एक कोटी अठ्ठयाण्णव लाख पंधरा हजार तीनशे फक्त) इतक्या खर्चाच्या बांधकामास पुढील अटींच्या अधिन राहून, या शासन निर्णयान्वये तत्वत: प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत प्रकल्पाच्या सविस्तर प्राकलनास मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि.चंद्रपूर यांचे साक्षांकन घेण्यात यावे.
२) प्रकल्पाचा नमुना नकाशा, वास्तु-मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेण्यात यावी. तसेच प्रकल्पाचे बांधकाम हाती घेण्यापुर्वी स्थानिक नगररचना प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी.
३) प्रकल्पाचे काम सुरु करण्यापूर्वी सहायक आयुक्त, समाजकल्याण, चंद्रपूर यांनी जागेच्या मालकी हक्काबाबतची खात्री करुन घ्यावी.
४) सदर प्रशासकीय मान्यता ही सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रकाची छाननी अंती केलेल्या शिफारशीच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे.
५) प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. नियमानुसार ई- निविदा प्रक्रिया राबवून बांधकाम यंत्रणा निश्चित करुन काम हाती घ्यावे.
६) प्रस्तुत प्रकल्पाचे बांधकाम सा.बां.विभागाने किंवा सक्षम प्राधिकरणाने विहित केलेल्या मानकानुसार, विहित दर्जाचे व गुणवत्तेचे राहील, याकरीता प्रकल्पाची सक्षम प्राधिकरणाने नियतकालीक तपासणी करुन घेणे आवश्यक राहील.
७) सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.
८) प्रस्तुत प्रकल्पातील बांधकामाचा कालावधी निश्चित करुन ते विहित वेळेतच पूर्ण होईल, याची संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण, चंद्रपूर यांनी दक्षता घ्यावी.
९) प्रस्तुत प्रकल्पामध्ये अपंगांना सोयी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

२. प्रस्तुत इमारत बांधकामावरील खर्च हा मागणी क्र.एन-३, २२५-अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९-अनुसूचित जाती घटक योजना, ०२- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजनातर्गत-दत्तमत्त) लेखाशिर्ष २२२५ डी ८२३ या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा.

३. या करीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी या कामासाठीचा निधी, वित्त विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या टप्प्यावर सदरहू कामाकरीता वितरीत करावा.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थहावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२७१३२११६०७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd83646 7a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2017.09.27 13:13:42 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर.
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
८. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.
९. सहायक आयुक्त, समाजकल्याण, चंद्रपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ चंद्रपूर.
११. अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरीयल सोसायटी, चंद्रपूर
१२. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१३. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१४.निवडनस्ती / बांधकामे.